## प्रेसनोट दि. ०१.०६.२०२०

श्री. भगवानसिंग व्यंकटसिंग राजपूत वय ३० वर्ष तलाठी, सजा नाटोली ता. शिराळा जि. सांगली यांना २०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे वडीलांचे नावे नाटोली ता. शिराळा जि. सांगली या ठिकाणी शेतजमीन आहे. तक्रारदार यांचे वडीलांनी तलाठी कार्यालय नाटोली या ठिकाणी शेत जमीनच्या सर्व्हे नंबर व सातबारा चुक दुरस्ती करणेबाबत अर्ज केला होता. सदरची चुक दुरूस्ती करून सातबारा उतारा देण्या करीता श्री. राजपूत तलाठी यांनी ५०००/- रूपचे लाचेची मागणी केली असलेबाबत तक्रारदार यांनी दि.०१.०६.२०२० रोजी तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज दिनांक ०१.०६.२०२० रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. राजपूत तलाठी यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रथम ५०००/- रूपये लाचेची मागणी करून चर्चे अंती ४०००/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कमे पैकी २०००/- रूपये लागलीच घेवून येण्यास सांगीतलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच तलाठी कार्यालय नाटोली ता. शिराळा जि. सांगली येथे सापळा लावला असता श्री. भगवानसिंग व्यंकटसिंग राजपूत वय ३० वर्ष तलाठी, सजा नाटोली ता. शिराळा जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून तक्रारदार यांचेकडून २०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने श्री. भगवानसिंग व्यंकटसिंग राजपूत वय ३० वर्ष तलाठी, सजा नाटोली ता. शिराळा जि. सांगली यांचे विरुध्द शिराळा पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, व श्रीमती सुषमा चव्हाण सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक व श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक तसेच पोलीस कर्मचारी अविनाश सागर, रविंद्र धुमाळ, संजय कलकुटगी, संजय संकपाळ, राधिका माने, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in